# प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा
## मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग
## सामुदायिक विज्ञान महाविद्यालय वनामकृवि, परभणी

जा.क्र: साविम/४६०/२०२५
दिनांक:७.०७.२०२५.

## जाहिरात
## सन २०२५-२६

सामुदायिक विज्ञान महाविद्यालय,वनामकृवि,परभणी अंतर्गत असणाऱ्या मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभागातील इलएचटी प्रकल्पाअंतर्गत प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेकरीता कंत्राटी सेवा आधारे शिक्षक व सहाय्यक पदासाठी तात्पुरती नियुक्ती करण्याकरीता थेट मुलाखती आयोजीत केल्या आहेत. या मुलाखतीसाठी उपस्थित राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी या जाहिरातीसोबत विहित नमुन्यातील जोडलेल्या अर्जामध्ये आपली माहिती सुवाच्च अक्षरात भरुन तथा त्यास आवश्यक असणारी साक्षांकित प्रमाणपत्रे जोडून तो अर्ज दि. १७.०७.२०२५ रोजी सायं.०४.०० वाजेपर्यंत उपरोक्त कार्यालयात सादर करावा. तद्नंतर या अर्जासोबत जोडलेल्या साक्षांकित प्रमाणपत्रांची छाननी होऊन त्यांची शैक्षणिक कामगिरी, कार्याचा अनुभव, प्रशस्तीपत्र इत्यादीसाठी प्राप्त झालेल्या गुणानुक्रमांकाच्या आधारे दि. २२.०७.२०२५ रोजी मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी (१:०५ प्रमाणे) सायंकाळी ५.०० वाजता सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या सूचना फलकावर तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (https://www.vnmkv.ac.in) जाहीर होईल. अर्जदार उमेदवारांना त्यांच्या मुलाखतीच्या पात्रतेबाबत काही तक्रार असल्यास त्यांनी त्यांची तक्रार दिनांक २३.०७.२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या कार्यालयास सादर करावी. या पदभरती दरम्यान पात्र ठरलेल्या उमेदवारांना थेट मुलाखतीचा दिनांक कळविण्यात येऊन त्याच दिवशी सकाळी ९.३० वा. या यादीतील केवळ पात्र उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसोबत पडताळणी करण्यात येऊन, त्याआधारे पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. या कंत्राटी पदावरील भरती प्रक्रियेतून निवड करण्यात आलेले उमेदवार सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्या आदेशावरुन विभाग प्रमुख, मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग यांच्या अधिनिस्त कार्यरत असतील.

**सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेकरीता कंत्राटी सेवा आधारे तात्पुरती नियुक्ती करावयाच्या शिक्षक व सहाय्यक तथा त्यांचे कंत्राटी सेवा वेतन बाबतचा तपशील**

| अ.क्र. | विविध पदांचा तपशील | पद संख्या | करार तत्वावर तात्पूरत्या स्वरुपातील कंत्राटी सेवा वेतन (रु.) /महिना | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षक | ६ | १५,०००/- | • सामुदायिक विज्ञान/गृह विज्ञान शाखा पदवीधर अथवा इतर शाखेतील पदवीधर, पूर्व प्राथमिक शाळेतील कार्याचा अनुभव तसेच बालकांची काळजी व शिक्षण यासंबंधी प्रशिक्षण असणे आवश्यक.<br>• प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील कार्याचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |
| २ | शिक्षक (अर्धवेळ) | १ | ७,५००/- | |
| ३ | सहाय्यक | ५ | १२,०००/- | • इ.१० वी उत्तीण असणे, पूर्व प्राथमिक शाळेत कार्य करण्याचा अथवा बालकांची काळजी घेण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>• प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील कार्याचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |
| ४ | सहाय्यक (अर्धवेळ) | ३ | ६,०००/- | |
| ५ | संगणक चालक | १ | १५,०००/- | • कोणत्याही शाखेतील पदवीधर तसेच इंग्रजी (४०) व मराठी (४०) टंकलेखन तथा दैनंदिन कार्यालयीन संगणकीय कार्याची कौशल्ये व अनुभव असणे आवश्यक.<br>• प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील कार्याचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक : दि.१७.०७.२०२५ (सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत)**
**पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक : दि.२२.०७.२०२५ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)**
**पात्रतेबाबत तक्रारीचा दिनांक : दि.२३.०७.२०२५ (सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत)**
**मुलाखतीचा दिनांक : पात्र उमेदवारांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.**
**उमेदवाराची निवड : थेट मुलाखत पद्धतीने.**

**उमेदवारांनी त्यांच्या संबंधीत पदाकरिता आवश्यक असलेली खालील कागदपत्रे तथा पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जासोबत जोडून त्याविषयी खात्री करुन घ्यावी.**

१. इ. १० वी गुणपत्रक व प्रमाणपत्र
२. इ. १२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्र
३. पदवी परीक्षा गुणपत्रक (सर्व वर्षांचे)
४. पदव्युत्तर परीक्षा गुणपत्रक (सर्व वर्षांचे)
५. बालशिक्षणासंबंधी घेतलेल्या प्रशिक्षणाची प्रमाणपत्रे
६. कार्यानुभव प्रमाणपत्र
७. संगणक/टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
८. चित्रकला/नृत्य/संगीत आदी कलासंबंधी परीक्षांचे प्रमाणपत्र
९. डी एड/बी.एड प्रमाणपत्र
१०. चारित्र्य प्रमाणपत्र
११. विशेष पारितोषिक /प्रशस्तीपत्रे/पुरस्कार इ.

**थेट मुलाखतीचे नियम व अटी**

- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेसाठी करार तत्वावर कंत्राटी सेवा आधारे नियुक्त करावयाची पदे ही संपूर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून उपरोक्त पदांवर निवड केलेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथे कायमस्वरुपी करण्याचा अथवा ज्येष्ठता मिळविण्याचा हक्क नसेल.
- उपरोक्त पदावर कार्य करण्यासाठी इच्छुक उमेदवारांचे शारीरिक तथा मानसिक स्वास्थ्य उत्तम असणे आवश्यक असून त्यांना कोणताही संसर्गजन्य आजार नसावा. सदरील पदभरती प्रक्रियेतून उमेदवारांची कंत्राटी तत्वावर निवड झाल्यामुळे ते त्यांच्या पदावर रुजू झाल्यानंतर त्यांना काही शारीरिक /मानसिक स्वास्थ्याच्या तक्रारी असल्याचे अथवा काही संसर्गजन्य आजार असल्याचे निदर्शनास आल्यास प्रशासनास अशा उमेदवारांना त्यांच्या नोकरीतून कमी करण्याचा अधिकार असेल.
- याबरोबरच त्यांना बालकांविषयी प्रेम व जिव्हाळा असण्याबरोबरच बालविकासाची तळमळ असावी.
- उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत त्यांचे वय,पात्रता,अनुभव इ. संबंधीचे पुरावे सादर करावे. तसेच प्रमाणपत्रे पडताळणीसाठी मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
- या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवाराच्या सेवा समाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेस त्यांच्या सेवांची आवश्यकता असेपर्यंत त्या चालू ठेवण्यात येतील. तथापी उमेदवाराच्या सेवा असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारास कोणत्याही सबबी न दाखवता कामावरुन कमी करण्याचा हक्क मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग प्रामुख्यांच्या तक्रारीवरुन सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्या, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
- निवड झालेल्या उमेदवारास संबंधीत पदावर रुजू होतांना रु.५०० च्या बंधपत्रावर नियम व अटीची मान्यता दयावी लागेल व त्या अटींची पुर्तता करणे बंधनकारक असेल.
- नियुक्त केलेल्या उमेदवारास मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग प्रमुख, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्या अधिनिस्त प्रत्यक्ष कार्य करावे लागेल.
- मुलाखतीसाठी उपस्थित राहाणाऱ्या उमेदवारांना प्रवास व दैनंदिन भत्ता अनुज्ञेय नसेल.
- या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या संख्येत बदल करण्याचा अधिकार विभाग प्रमुख, मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग यांच्या मागणीनुसार सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्या, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांना असेल.
- सदरील पदभरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांनी राखून ठेवले आहेत.

विभाग प्रमुख
मानव विकास व कौटुंबिक अभ्यास
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्या
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी

# प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा
# मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग
# सामुदायिक विज्ञान महाविद्यालय वनामकृवि, परभणी

## कंत्राटी सेवा आधारे तात्पुरती नियुक्ती करण्याकरिता थेट-मुलाखत अर्ज

जाहिरात क्र.साविम/४६०/२०२५
दि.०७/०७/२०२५

शिक्षक (अर्धवेळ /पूर्ण वेळ), सहाय्यक (अर्धवेळ /पूर्ण वेळ), संगणक चालक

पासपोर्ट फोटो

उमेदवाराचे संपूर्ण नाव (विवाहापूर्वीचे) ------------------------------------------------

विवाहीत असल्यास, विवाहानंतरचे नाव------------------------------------------------

जन्म तारीख--------------- वय ---------वर्षे (मुलाखतीच्या दिवशी वय)
(वयाचा दाखला सोबत जोडावा)

संपर्काचा पूर्ण पत्ता------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक (किमान २ )--------------------------------------------------------------

जात व प्रवर्ग ----------------------------------------------------------------------------

अर्ज केलेले पद -

| शिक्षण | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी | विभागीय मंडळ/ विद्यापीठ |
|---|---|---|---|---|
| आचार्य | | | | |
| पदव्यूत्तर (एमएस्सी/एमए/एमकॉम इ.) | | | | |
| पदवी (बीएस्सी/बीए/बीकॉम इ.) | | | | |
| डिप्लोमा | | | | |
| इ. १२ वी | | | | |
| इ. १० वी | | | | |
| बी. एड/बी पी एड इ. | | | | |
| डी. एड | | | | |
| प्रशिक्षण<br>६ महिने किंवा त्याहून अधिक -<br>६ महिने किंवा त्याहून कमी | | | | |
| टंकलेखन<br>इंग्रजी<br>मराठी<br>संगणक | | | | |
| अनुभव | | | | |
| कौशल्ये,<br>गायन/नृत्य/चित्रकला/हस्तकला | | | | |
| पुरस्कार/प्रशस्तीपत्र, पूर्व प्राथमिक शिक्षण संबंधीत इतर प्रमाणपत्र | | | | |

- बालकांची काळजी व शिक्षण याबाबत प्रशिक्षण घेतले आहे का ? होय/नाही
  घेतले असल्यास त्याबाबत माहिती लिहा ---------------------------------------------------------------
  ---------------------------------------------------------------------------------------------------
  ---------------------------------------------------------------------------------------------------
- बालकांची काळजी, विकास व शिक्षण या क्षेत्रात कार्य करण्याचा अनुभव आहे का ? होय/नाही
  असल्यास त्याबाबत माहिती लिहून अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक -----------------------------------
  ---------------------------------------------------------------------------------------------------
- विशेष गुणः गायन/नृत्य/चित्रकला/हस्तकला/गोष्टी सांगणे/वकृत्व/ इतर
- संगणक कार्याचा अनुभव आहे का ? होय/नाही
  असल्यास त्याबाबत माहिती लिहून अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक -----------------------------------
  ---------------------------------------------------------------------------------------------------

| प्रशिक्षणाचे नाव | कालावधी |
| --- | --- |
| ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ |

**स्वयंघोषणापत्र**

मी नमुद केलेली उपरोक्त माहिती ही सत्य असून सदर माहिती खोटी आढळून आल्यास त्या करीता मी जबाबदार राहील, याबाबत मला संपूर्ण जाणीव आहे. तसेच उपरोक्त जाहिरातीचे मी काळजीपूर्वक वाचन केलेले असून या पदभरती प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या निवड समितीने माझ्याबाबत घेतलेला निर्णय मला मान्य असेल.

उमेदवाराची स्वाक्षरी व दिनांक